**"ऑक्टोबर २०१७" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- दिनांक ४ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये दोषपूर्ण पार MahaPAR संगणक प्रणालीमधून वगळण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.
- दिनांक ६ ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयांच्या आस्थापनेवरील १९५ अस्थायी पदे दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयासमवेत परिशिष्ट-ब मधील राज्य शासकीय अधिकाऱ्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यासंबंधीच्या सर्वसाधारण सूचनेतील मुद्दा क्रमांक-७.२ मधील सांख्यिकी गुणांकनामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- दिनांक १० ऑक्टोबर २०१७ च्या पत्रान्वये, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय क्रमांक-1/9/2017-E-II(B), दिनांक २० सप्टेंबर २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनाची प्रत महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या माहितीस्तव अग्रेषित करण्यात आली आहे. या ज्ञापनानुसार दिनांक १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आलेला १ वाढीव दराने महागाई भत्ता व ज्ञापनातील तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागू राहतील. त्यानुसार दिनांक १ जुलै २०१७ पासून ५ दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.
- दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ च्या पत्रान्वये, केंद्र शासनाच्या कार्मिक, लोक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय, निवृत्तीवेतन व निवृत्तीवेतनधारकांचे कल्याण विभाग, नवी दिल्ली क्रमांक-42/15/2016-P&W(G), दिनांक २८ सप्टेंबर २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनाची प्रत महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या माहितीस्तव अग्रेषित करण्यात आली आहे. या ज्ञापनानुसार दिनांक १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आलेला १ वाढीव दराने महागाई भत्ता व ज्ञापनातील तरतुदी महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना लागू राहतील. त्यानुसार दिनांक १ जुलै २०१७ पासून ५ दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहिल.
- दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील २४ अस्थायी पदे दिनांक ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १७ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय नियंत्रण कक्षामध्ये मंत्रालयीन विभागातून नियुक्ती करावयाच्या दिनांक २६ मार्च १९९३ च्या शासन परिपत्रकामध्ये विहित केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या रचनेमध्ये बदल करण्यात आला आहे.
- दिनांक २४ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये राज्यात दिनांक ३० ऑक्टोबर २०१७ ते ४ नोव्हेंबर २०१७ हा कालावधी दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) म्हणून साजरा करण्यात येणार आहे.
- दिनांक ३० ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांच्या विशेष अहवालावरील कार्यवाहीत बदल करुन, कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या वेतनवाढी अनुज्ञेयतेच्या तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.

**(ख) <u>प्रशिक्षण</u>**

- दिनांक १० ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेच्या निकालाच्या गुणांच्या फेरमोजणीचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

**(ग) <u>सरळसेवा नियुक्ती / पदोन्नती / पदावनती / पदोन्नतीचा मानीव दिनांक व नियमित दिनांक</u>**

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याला पदोन्नतीचा नियमित दिनांक देण्यात आला आहे.

**(घ) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील ७ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. एका निम्नश्रेणी लघुलेखकाची बदली करण्यात आली आहे.
- २ निम्नश्रेणी लघुलेखकांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.
- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याला कार्यमुक्त करण्यात आले.

**(ङ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- २ कक्ष अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने पदस्थापना देण्यात आली आहे.
- एका उपसचिवाला प्रत्यावर्तनानंतर बदलीने पदस्थापना देण्यात आली आहे.

**(च) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ११ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालय आहार / उपाहारगृहाच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जानेवारी २०१६ व १ जानेवारी २०१७ रोजीची स्थिती दर्शविणारी तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

***********